**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ३६१/२०२६**
**शासन वि. संतोष शिवराम घरत**
**नि.३**

**<u>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालय, कर्जत, जि. रायगड</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | गुन्हा घडल्याची तारीख | – | १९/०५/२०२६ |
| २. | फिर्याद दाखल तारीख | – | १९/०५/२०२६ |
| ३. | फिर्यादीचे नाव | – | **चंद्रकांत नथुराम पयेर**<br>पो.हवा./१६२६<br>कर्जत पोलीस स्टेशन<br>ता. कर्जत, जि. रायगड |
| ४. | आरोपीचे नाव | – | **संतोष शिवराम घरत**<br>वय – ४३ वर्षे,<br>रा.– मोहिली,<br>ता. कर्जत जि. रायगड |

५. आरोपाचा आशय –

हा की, दिनांक १९/०५/२०२६ रोजी ११.१५ वाजण्याच्या सुमारास मौजे कर्जत येथील जूनी बाजारपेठ शिंदे उपहारगृहा समोर सार्वजनिक रोडवर त्यांचे ताब्यातील रिक्षा क्र. एम.एच.४६ बी.डी.४२९४ ही वरील सार्वजनीक ठिकाणी लोकांचे जिवीतास धोका निर्माण होईल व वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशा पध्दतीने उभी करुन ठेवल्यामुळे याद्वारे तुम्ही भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २८५ अन्वये माझे अधिकारक्षेत्रात शिक्षेस पात्र गुन्हा केला आहे.

Sd/–
(श्रीमती ए. एस. वाडकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कर्जत,
जि. रायगड

कर्जत
दिनांक – ३०/०६/२०२६

**<u>आरोपीचे प्रतिकथन</u> –**

प्र.क्र. १ – तुम्हाला या खटल्याच्या दस्तऐवजाच्या प्रती मिळाल्या आहेत काय ?

उत्तर – होय.

प्र.क्र. २ – मी तुम्हाला तुमच्या मातृभाषेत समजावून सांगितलेला गुन्हयाचा आशय कळाला आहे काय ?

उत्तर – होय.

प्र.क्र. ३ – तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?

उत्तर – होय, मला गुन्हा कबूल आहे.

Sd/-

--------------------

आरोपीची सही

समक्ष

Sd/-

कर्जत
दिनांक – ३०/०६/२०२६

(श्रीमती ए. एस. वाडकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कर्जत,
जि. रायगड

**<u>न्यायनिर्णय</u>**

आरोपीने स्वेच्छेने गुन्हा कबूल केला आहे. शिक्षेबाबत त्याचे म्हणणे ऐकण्यात आले. आरोपीने यापुर्वी अशा प्रकारचा गुन्हा केला नसल्याचे कथन केले, म्हणून आरोपीने त्यास कमीत कमी दंड करण्याची विनंती केली. या न्यायालयाच्या मते आरोपीने केलेल्या कथनामध्ये तथ्य आढळून येते. वरील कारणास्तव व गुन्हयाचे स्वरुप लक्षात घेता या न्यायालयाच्या मते खालीलप्रमाणे शिक्षा न्यायाचे दृष्टीने योग्य होईल. म्हणून मी खालील आदेश देत आहे.

# <u>आदेश</u>

| |
|---|
| आरोपी नामे **संतोष शिवराम घरत,** रा.— मोहिली, ता. कर्जत जि. रायगड**,** यास भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७५ प्रमाणे भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २८५ प्रमाणे दंडनीय अपराधास दोषी ठरविण्यात येत असून **रक्कम रुपये १०००/– (रक्कम रुपये एक हजार मात्र)** एवढया दंडाची शिक्षा सुनावण्यात येते. दंड न भरल्यास एक दिवस साध्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात येत आहे. |

(खुल्या न्यायालयात घोषित.)

Sd/–

कर्जत
दिनांक — ३०/०६/२०२६

(श्रीमती ए. एस. वाडकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कर्जत,
जि. रायगड